**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.**

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-**

**दिनांक : 07/02/2020**

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>फेब्रुवारी महिन्याची मा. सर्वसाधारण सभा, शनिवार, दिनांक 15 फेब्रुवारी 2020 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**1. प्रश्नोत्तरे.**

**<u>आयुक्तांकडील प्रस्ताव :</u>**

**<u>ठरावाच्या सूचना</u> :-**

**2 ते 4. श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून:-**

**(2)** प्रभाग क्र. 108 मधील मोकळे भुखंड महिला मंडळ, बचत गट यांना लघुउदयोग, साहित्य विक्री करीता उपलब्ध करुन देणे. **(3)** प्रभाग क्र. 108 सेक्टर-48 येथे छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशव्दार तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशव्दार उभारणे. **(4)** प्रभाग क्र. 108 मधील CBSE शाळेत CCTV यंत्रणा उभारणे.

**5 व 6. श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून:-**

**(5)** प्रभाग क्र. 80 मधील नागरीकांची लोकसंख्या दहा हजाराच्यावर आहे. येथील परिसर झोपडपट्टीचा विभाग असुन हया परिसरात सर्वत्र मध्यम वर्गीय नागरीक वास्तव्य करत असतात. येथील नागरीकांना खाजगी हॉस्पिटल न परवडणारी आहेत. येथील दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असुन हे लक्षात घेता नागरीकांच्या आरोग्याचे सुखसुविधांकरीता शिवाजीनगर मधील नवीन बालवाडी इमारतीमध्ये प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र चालु करणे. **(6)** महाराष्ट्र शासन निर्णया नुसार दिनांक 01/01/2000 अथवा त्यापुर्वीपासुनची झोपडी संरक्षणप्राप्त असल्याचे ठरविल्यामुळे प्रभाग क्र. 80 मधील महात्मा गांधीनगर, सरोज क्वारी, रमेश मेटल क्वारी, युनिटेक कंपनी जवळच्या क्षेत्रामध्ये ओव्हर टँक बांधुन व बुसटिंग पंपाव्दारे पाणी पुरवठा करुन तेथील झोपडीधारकांस वैयक्तिक नळ जोडणी करणे.

**7. ते 9 श्री. विनोद विनायक म्हात्रे, यांजकडून :-**

**(7)** प्रभाग क्र. 110 करावे मधील कै. गणपतशेठ तांडेल मैदान सिडकोकडुन नवी मुंबई महापालिकेस हस्तांतरीत झालेला असुन त्यामध्ये त्याचे क्षेत्रुफळ 36476 चौ.मी. असुन त्यामध्ये 22000 चौ.मी. खेळाचे मैदान , 10000 चौ.मी प्रदर्शनीय मैदान व उर्वरित 4476 चौ.मी उदयान असे विनियोगाचे क्षेत्र ठरलेले आहे. करावे गाव हे नवी मुंबईतील सर्वात मोठे गाव असुन करावे गावातील नागरीकांना लग्न समारंभ, साखरपुडा समारंभ, वाढदिवस समारंभ व इतर धार्मिक कार्यासाठी सभागृह नाही. तरी प्रदर्शनीय मैदान 10000 चौ.मी. असुन त्यामधील 5000 चौ.मी. क्षेत्रामध्ये महापालिकेने नेरुळ येथील आगरी कोळी भवनाच्या धर्तीवर समाजमंदीर बांधणे. **(8)** प्रभाग क्र. 110 करावे मधील कै. गणपतशेठ तांडेल मैदान सिडकोकडुन नवी मुंबई महापालिकेस हस्तांतरीत झालेला असुन त्यामध्ये त्याचे क्षेत्रुफळ 36476 चौ.मी. असुन त्यामध्ये 22000 चौ.मी. खेळाचे मैदान ,10000 चौ.मी प्रदर्शनीय मैदान व उर्वरित 4476 चौ.मी उदयान असे विनियोगाचे क्षेत्र ठरलेले आहे. करावे गाव हे नवी मुंबईतील सर्वात मोठे गाव आहे. आज नवी मुंबई शहर हे सर्व क्षेत्रात आधुनिक व अग्रेसर असे शहर आहे. परंतु शहरात एक आतंरराष्ट्रीय स्तराचे इनडोर गेम स्टेडीअम नाही. त्यामुळे नवी मुंबईतील खेळाडुना सरावासाठी इतर शहरात जावे लागते. तरी प्रदर्शनिय मैदानाच्या 5000 चौ.मी. क्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे इनडोअर गेम स्टेडीअम बांधणे. **(9)** प्रभाग क्र. 110 करावे मधील पामबीच रोडच्या पच्छिमेकडील टी.एस.चाणक्याला लागुन 14000 चौ.मी. भुखंड (मोकळी जागा) आहे. नवी मुंबई महानगरपालिकेचे महाविदयालयीन शिक्षणासाठी कुठल्याही प्रकारचे महाविदयालय नसुन सदरील मोकळया भुखंडावर नवी मुंबईतील विदयार्थ्यांना मोफत महाविदयालयीन शिक्षण घेण्यासाठी आर्टस, कॉमर्स, सायन्स व नर्सिंग कोर्स तसेच इतर पदवी अभ्यासासाठी महाविदयालय बांधणे.

**10 . श्रीम. उषा पुरुषोत्तम भोईर, यांजकडून :-**

कोपरी गांव येथील स्मशानभुमी ग्रामपंचायत कालीन आहे. सदर स्मशानभुमीमध्ये गावातील ग्रामस्थांच्या अनेक पिढयांचा अंतिम विधी झालेल्या आहेत. कोपरी ग्रामस्थांच्या भावनेचा आदर करुन सदर स्मशानभुमी जतन करणे.

**11 ते 13 . श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**

**(11)** नेरुळ सेक्टर 16ए, 16 व 18 येथे आवश्यक त्या ठिकाणी बेंचेस बसविणे.**(12)** नेरुळ सेक्टर 16ए भुखंड क्र. 150 व 151 येथे लाल माती पुरविणे व बेंचेस बसविणे. **(13)** नेरुळ सेक्टर 16ए, 16 व 18 येथील सर्व फुटपाथला रंगरंगोटी करणे.

**14 व 15 . श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-**

**(14)** माझ्या प्रभाग क्र. 54 वाशी सेक्टर-29 मधील डायमंड गृहनिर्माण सोसायटी ते सिटी कॉर्नर 1 सोसायटी समोरील पदपथाखालील वाहिन्या सिडकोकालीन व अरुंद असल्याने त्यामध्ये मोठया प्रमाणात गाळ साठल्याने पावसाळी पाण्याचा निचरा व्यवस्थीत होत नसुन रस्त्यावरती खडडे पडुन मोठया प्रमाणात पाणी साचुन राहिल्याने नागरीकांना डेंग्यु, मलेरिया यासारख्या साथीच्या रोगांना तोंड दयावे लागत आहे. त्याकरीता गटारांची रुंदी व खोली नियमाप्रमाणे वाढविण्यात यावी व पदपथाची नव्याने सुधारणा करणे.**(15)** माझ्या प्रभाग क्र. 54 वाशी सेक्टर- 28, 29 व 14 मधील अ‍ॅकरवाला स्कुल ते ब्लयु डायमंड हॉटेलपर्यत नागरी वस्तीतुन वाहणारा एकमेव उघडा नाला असुन, त्या उघडया नाल्यामुळे नाल्याच्या दोन्ही बाजुस राहणा-या परिसरात डासांचा व घाणीचा मोठया प्रमाणात प्रार्दुभाव वाढलेला आहे. त्यामुळे तेथील नागरीकांना डेंग्यु, मलेरिया यासारख्या साथीच्या रोगांना सामोरे जावे लागते आहे. तरी हा उघडा नाला बंदिस्त करण्यासाठी सदर बाबत योग्य ती कार्यवाही करणे.

**16 व 17 . श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-**

**(16)** प्रभाग क्र. 51 मधील अश्वित हॉटेलच्या समोरील मलनि:स्सारण वाहिन्या नवीन टाकणे. **(17)** प्रभाग क्र. 51 मधील पाण्याच्या टाकीजवळ नागरीकांच्या उपयोगासाठी गार्डन तयार कर

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**

**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 07 फेब्रुवारी 2020.**